पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर.
( विशेष शाखा )
कार्या –०७२१ – २५५१००९      फॅक्स – २५५१०१०
Email - sb.cpamt@mahapolice.gov.in -
Website- http://www.amravaticitypolice.org

जा.क्र:विशा/माध्य.व उच्च माध्य.परीक्षा/२०२५   अमरावती शहर,        दिनांकः– ०८/०२/२०२५

## प्रेस नोट

महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,शासन परिपत्रक **क्र. संकिर्ण –०२२३/प्र.क्र. १२/एस.डी.२ दिनांक १४/०२/२०२३** नुसार राज्यातील कॉपीमुक्त अभियानाची अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश दिले आहेत. पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे इयत्ता १२ वी ची परीक्षा दिनांक ११/०२/२०२५ ते दिनांक १८/०३/२०२५ पावेतो व इयत्ता १० वी ची परीक्षा दिनाक २१/०२/२०२४ ते १७/०३/२०२५ या कालावधीत घेण्यात येणार आहे. या कालावधीत शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधित राहावी व परीक्षा केंद्रावर गैरप्रकार टाळण्याच्या दृष्टीने **मा. नविनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी कलम १६३ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ नुसार जमावबंदीचे आदेश निर्गमीत केले** असुन त्या आदेशानुसार खालीलप्रमाणे प्रतिबंध घालण्यात आलेले आहे.

१.परीक्षा केंद्राचे १०० मिटर परिसरात कोणत्याही विद्यार्थी /उमेदवार तसेच परीक्षेशी संबंधीत पर्यवेक्षक, बोर्ड/शिक्षण अधिकारी व संबंधित कर्मचा–यांव्यतिरीक्त कोणासही परीक्षा केंद्रावर प्रवेश करण्यास प्रतिबंध घालीत आहे.

२.परीक्षा केंद्राचे १०० मिटर परिसरातील सर्व सार्वजनिक टेलीफोन बुथ /एस.टी.डी./आय. एस.डी/फॅक्स केंद्र बंद ठेवावीत.

३.परीक्षेचे ठिकाणी डिजीटल डायरी/ कॅल्क्युलेटर/ भ्रमणध्वनी/ पेजर/मायक्रोफोन / ब्ल्युटूथ /स्मार्टवॉच / ट्रांजीस्टर / वायरलेस / कॅमेरा अंतर्भुत असलेली कोणत्याही प्रकारची साधने/सिम कार्ड/दुरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तू वापरास परीक्षा केंद्रात घेवुन जाण्यास प्रतिबंध घालीत आहे.

४.परीक्षा केंद्राचे ५० मिटर परीसरातील सर्व झेरॉक्स दुकाने बंद ठेवावीत.

सदर आदेश दिंनाक **१०/०२/२०२५ चे ००.०० ते दिनांक १८/०३/२०२५ चे २४.००** वा. पावेतो पोलीस आयुक्तालयातील परीक्षा केंद्राच्या परीसरात लागु राहतील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणा–या व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता कलम 223 प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत **मा. नविचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी सर्व पो.ठाणे प्रभारी यांना सुचित केलेले आहे.**

पोलीस आयुक्त, अमरावती
करीता

Scanned with OKEN Scanner